अधावत मूलभूत व्यवस्था व सोयी सुविधांसह माळेगाव यात्रा यावर्षी अधिक संस्मरणीय होईल >> पान 2

नामांकित कंपनीच्या नावारवाली फसवणूक, मात्र एटीएममधून पैसे काढले आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकले; दोन अटक, एक फरार >> पान 3

शारंगधर बालाजी महोत्सवाची महाप्रसादाने शानदार सांगता >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 127 ■ बुधवार, दि. 18 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

समस्या म्हणजे नवी संधी.



स्वप्नील जोशीने दिली आनंदाची बातमी! पहिल्या गुजराती चित्रपटाची घोषणा, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या अभिनेत्रीसह करणार काम

आतील पान

## महामेट्रो आणि आशियाई विकास बँक यांच्यात प्रकल्प करार

**नागपूर मेट्रो प्रकल्प टप्पा-२ साठी १५२७ कोटींचे अर्थसहाय्य**

### नागपूर मेट्रो प्रकल्प टप्पा-२ ला चालना मिळाल्यामुळे नागपूर शहरासह परिसराचा अधिक गतीने विकास होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १ हजार ५२७ कोटी रुपयांचे (२०० मिलियन डॉलर) अर्थसहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात यासंदर्भात प्रकल्प करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.**

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि आशियाई विकास बँकेच्या संचालक मिओ ओका यांनी अर्थसहाय्याच्या करारावर सह्या केल्या. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी आशियाई विकास बँक आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्याकडून एकूण ३५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे. त्यापैकी १५२७ कोटी रुपये आशियाई विकास बँकेकडून मिळणार असून त्यासंदर्भातील करार करण्यात आला. महामेट्रोला हा वित्तपुरवठा जपानी येन या चलनामध्ये मिळणार आहे. यामुळे कर्जावर तुलनेने कमी व्याज द्यावे लागणार आहे. महामेट्रोला या कर्जाची रक्कम केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून उपलब्ध केली जाणार आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-२ हा खापरी ते एमआयडीसी इएसआर दरम्यान १८.५ किलोमीटर, ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी दरम्यान १३ किलोमीटर, प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्टनगर दरम्यान ५.६ किलोमीटर आणि लोकमान्यनगर ते हिंगणा दरम्यान ६.७ किलोमीटर असा एकूण ४३.८ किलोमीटरचा असणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा लाभ नागपूर परिसरातील १० लाख रहिवाशांना होणार आहे. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव आश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, विविध विभागांचे सचिव, आशियाई विकास बँकेचे विविध विषयतज्ज्ञ यांच्यासह महामेट्रोचे संचालक (एसपी) अनिलकुमार कोकाटे, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे आदी उपस्थित होते.

## अकॅडमी मध्ये शिकवणाऱ्या शिक्षकानेच केले अल्पवयीन मुलासोबत अनैसर्गिक कृत्य



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरातील करवीर पोलिस हद्दीमध्ये चक्क अकॅडमी मध्ये शिकवणाऱ्या शिक्षकाने अल्पवयीन मुलासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. करवीर तालुक्यातील कसबा बीडमधील शिष्यवृत्ती परीक्षा आणि केंद्रीय शाळा प्रवेश परीक्षांची तयारी करून घेणाऱ्या एका निवासी अकॅडमीमध्ये ही घटना घडलीय. ८ डिसेंबर रोजी घडलेला प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी या अकॅडमीच्या मुख्याध्यापकाला अटक केलीय. दरम्यान सध्या घडत असलेल्या या आणि अशा घटनांमुळे पालकांनीही आपल्या मुलांच्या बाबतीत विशेष काळजी घेण्याचे आवाहन देखील पोलिसांनी केलंय.

## ओबीसी कार्यकर्त्यांकडून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** ओबीसी नेते छगन भुजबळ यांना मंत्रीमंडळात स्थान न दिल्याने ओबीसी समाजाकडून पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अजित पवार यांच्या फोटोला जोडे मारत आंदोलन करण्यात आले. ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांना राज्याच्या मंत्रीमंडळात स्थान न दिल्यामुळे राज्यातील ओबीसी समाजात नाराजी निर्माण झाली आहे. अजित पवानांचा निषेध करण्यासाठी कार्यकर्ते काळ्या कलरचे रंगाचे कपडे घालून आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या विरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली.

## ठाण्यातील सराईत मोबाईल चोरटा गजाआड; मोटार सायकल सह दोन लाखाचा मुद्देमाल हस्तगत

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे आयुक्तालयाच्या भिवंडी गुन्हे शाखा क्र. २ द्वारा सराईत मोबाईल चोरटा शेरआली उर्फ पिल्या इमाम फकीर(२२) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून पोलिसांनी गुन्ह्यातील मोटार सायकल, चोरलेली मोबाईल असा २ लाख ४५ हजार १९९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून एकूण १२ चोरीच्या गुन्ह्याची उकल केली आहे. भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाला शांतीनगर पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत आरोपी शेरआली उर्फ पिल्या इमाम फकीर(२२) रा. घर नं ५८६, गणेश लॉन्ड्री गल्ली, गायत्रीनगर पोलीस चौकी समोर, भिवंडी हा रामनगर डम्पिंग ग्राउंड जवळ चोरीची मोटार सायकल आणि मोबाईल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्याला पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. त्याच्याकडे नंबर प्लेट नसलेली चोरीची मोटार सायकल आणि १० मोबाईल आढळले. त्याला ताब्यात घेऊन अधिकची चौकशी केली असता चोरीची मोटार सायकल आणि विविध कंपनीचे ११ मोबाईल असा २ लाख ४५ हजार १९९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यामध्ये विविध पोलीस ठाण्यात मोबाईल चोरीचे १४ गुन्हे दाखल आहेत. पोलीस पथकाने १२ गुन्हे उघडकीस आणलेल्या गुन्ह्यात ११ मोबाईल चोरीचे गुन्हे आणि एक वाहन चोरीचा गुन्हा असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



## छगन भुजबळांबद्दल वाईट वाटले, ते अधून-मधून माझ्या संपर्कात; नागपुरातून ठाकरेंनी टाकली गुगली

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात अनेक नवख्या आमदारांना स्थान देण्यात आलं आहे. मात्र, ज्येष्ठ व वरिष्ठ नेते राहिलेल्यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. त्यामध्ये, अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमधून ४ माजी मंर्त्यांना डच्चू देण्यात आला असून म ाजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व माजी गृहमंत्री राहिलेल्या दिलीप वळसे पाटील यांनाही डावलण्यात आलं आहे. याबाबत, छगन भुजबळ यांनी स्पष्टपणे आपली नाराजी उघड केली. नागपूर अधिवेशनातून नाशिकला परत येताच त्यांनी मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी, पत्रकारांशी बोलताना नाव न घेता थेट अजित पवार व प्रफुल्ल पटेल यांना लक्ष्य केलं. आता, भुजबळांच्या नाराजीवर विरोधकांकडून प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यानंतर आता शिवसेना युबीटी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनीही प्रतिक्रिया दिली. तसेच, भुजबळ हे अधून मधून संपर्कात असतात, असे म्हणत महायुतीच्या नेत्यांना टोलाही लगावला.



मंत्रिमंडळ विस्तार झाला, मात्र वजाबाकीची चर्चा अधिक आहे. नाराजांचे बार अधिक म ोठ्याने वाजत आहेत, विधिमंडळ अधिवेशनाची प्रथा असते, मुख्यमंत्री मंर्त्यांची ओळख करून देतात, पण अनेक आरोप असेलेल्यांचा परिचय मुख्यमंत्री यांना करून द्यावा लागला, हे पहिल्यांदा घडत असेल, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना टोला लगावला.

भुजबळांच्या बाबतीत मला वाईट वाटले, आता अनेकांच्या बद्दल मला आतून वाईट वाटतंय. कारण, जे एका अपेक्षेने तिकडे गेले होते, तरी बरे घट्ट झालेले जॅकीट आता तरी घालायला मिळाले. काही जणांची जॅकेट आणखी वाट पाहात असतील, त्यांच्याबद्दल मी सहानुभूती व्यक्त करतो, असे म्हणज छगन भुजबळांसह मंत्रिपद नाकारलेल्या आमदारांच्या नाराजीवर उद्धव ठाकरे यांनी भाष्य केलं. लाडका आम दार, किंवा लाडकी माणसं अशी सरकारची काही योजना आहे का, असेही ठाकरेंनी म्हटले. सरकारची दयना झाली आहे, त्यामुळे वहाँ नही रहना हे भुजबळांचे म्हणणे योग्य आहे. भुजबळ हे आता संपर्कात नाहीत, मात्र ते अधून-मधून संपर्कात असतात, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी महायुतीच्या नेत्यांना सूचक टोलाही लगावला आहे.

## विधानपरिषद सभापती पदाची निवडणूक १९ डिसेंबर रोजी - उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

दैनिक आपला विदर्भ




**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या आदेशानुसार विधानपरिषदेच्या सभापती पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जाहीर केला असून १९ डिसेंबर २०२४ रोजी मतदान होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी सभापती रामराजे निंबाळकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर सभापतीपद रिक्त आहे. या पदासाठी १९ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. यासाठी १८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यानंतर अर्जांची छाननी होणार असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी जाहीर केले.

## माजी मंत्री दत्तात्रय राणे यांना विधानसभेत श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विधानसभेचे माजी सदस्य व माजी मंत्री दत्तात्रय महादेव राणे यांना आज विधानसभेत श्रद्धांजली वाहण्यात आली. दिवंगत माजी सदस्य दत्तात्रय राणे यांच्या दुःखद निधनाबद्दल विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी शोक प्रस्ताव मांडला.

## विधानसभा तालिका सभाध्यक्षांची नियुक्ती जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विधानसभा कामकाजासाठी तालिका सभाध्यक्षांची नियुक्ती विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आज सभागृहात जाहीर केली. विधानसभा तालिका सभाध्यक्षपदी सदस्य सर्वश्री विजय रहांगडाले, रमेश बोरनारे, शेखर निकम, दिलीप सोपल यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी जाहीर केले.


## करदात्याप्रती सहृदयता जपत सक्षम व पारदर्शीपणे काम करा - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

दैनिक आपला विदर्भ

**राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या ७८ व्या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन**

**नागपूर/प्रतिनिधी :** करदात्यांकडून कररूपात मिळणारा पैसा हा त्यांच्यासाठीच आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा निर्मितीसाठी वापरात येतो. हा संदेश विविध माध्यमातून त्यांच्यापर्यंत सकारात्मक पद्धतीने पोहोचविण्याची गरज आहे. आयकर अधिकाऱ्यांनीही करदात्या प्रती सहृदयता जपत सक्षम व पारदर्शिपणे काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीत भारतीय राजस्व सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन बोलत होते. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे सदस्य हरिंदर बीर सिंग




गिल, प्रधान महानिदेशक (प्रशिक्षण) संजय बहादुर, राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीचे महानिदेशक (प्रशिक्षण) पी. सेलवा गणेश, अपर महानिदेशक (प्रशासन) मुनीष कुमार, अपर महानिदेशक शिदारामप्पा कपटनवार, अप्पर महानिर्देशक आकाश देवांगन, अपर महानिदेशक अंकुर आलिया, प्रशिक्षणार्थी आयकर अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, उत्कृष्ट प्रशासक म्हणून घडविणारे हे प्रशिक्षण या तुकडीला परिपूर्ण करणार आहे. हे प्रशिक्षण अधिकाऱ्यांच्या कारकिर्दीचा महत्वाचा टप्पा असून त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यात राष्ट्रीय कर अकादमी महत्वाची भूमिका पार पाडेल. करदात्यांसोबत योग्य व्यवहार करुन करसंकलन करणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल. आपले कर्तव्य बजावताना आदर्श परिमाणांसोबत तडजोड न करता नैतिकता व सदाचाराचे पालन करुन या पदाला योग्य न्याय द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीने आपली गौरवशाली परंपरेची जोपासना करुन अधिकाधिक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले आहे. यावर्षीची ७८ वी तुकडी प्रशिक्षित होत आहे, हे अभिमानास्पद आहे. २०४७ पर्यंत भारत एक विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प आपण पूर्णत्वास नेणार आहोत. त्या करता त्यांचाही मोलाचा वाटा आणि सहभाग असणार आहे, असा आशावादही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला.

तत्पूर्वी, अकादमीचे अंकुर आलीया यांनी ७८ व्या तुकडीतील प्रशिक्षणार्थी विषयी माहिती दिली. कार्यक्रमापूर्वी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नॅशनल कॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस अर्थात राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी ही केंद्र शासनाच्या भारतीय महसूल सेवा अधिकाऱ्यांसाठी (आयकर) सर्वोच्च प्रशिक्षण संस्था आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग युपीएससी द्वारे आयोजित नागरी सेवा परीक्षांद्वारे आयआरएस अधिकाऱ्यांची भरती केली जाते. थेट भरती झालेले हे अधिकारी क्षेत्रीय कार्यालयात नियुक्ती करण्यापूर्वी एनएडीटी, नागपूर येथे १६ महिन्यांचे सेवा पूर्व प्रशिक्षण पूर्ण करतात.

७८ व्या तुकडीच्या नवीन बॅचमध्ये रॉयल भूतान सर्व्हिसच्या २ अधिकाऱ्यांसह १४५ अधिकारी प्रशिक्षणार्थी आहेत. राष्ट्राच्या विकासात प्रभावीपणे योगदान देण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि मानसिकतेसह हे प्रशिक्षण सुसज्ज करते. इंडक्शन ट्रेनिंगची प्रशिक्षण पद्धत विकसित भारत या संकल्पनेवर आधारित आहे. अधिकाऱ्यांमध्ये उत्कृष्टता, उत्तरदायित्व आणि नवोपक्रमाची संस्कृती वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले जाते . कार्यक्रमात वर्ग सत्रे, व्यायाम, केस स्टडी आणि परस्पर चर्चा यांचे मिश्रण समाविष्ट आहे, ज्यामध्ये कर प्रशासन, नेतृत्व आणि सार्वजनिक सेवेच्या विविध पैलूंचा समावेश आहे.

## पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण मिळावे!

बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगा मध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. ज्या तरुणांमध्ये आत्महत्या करण्याची हिंमत नसते ते तरुण पत्नीचा जाच मुकाटपणे सहन करतात किंवा घर सोडून आश्रमात जातात. औरंगाबादेतील वाळूंज भागात असाच पत्नी पिढीत पुरुषांचा आश्रम आहे. या आश्रमात काही पत्नी पिढीत पुरुष राहतात हे पत्नी पिढीत पुरुष वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळ पूजन करून पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. हे पुरुष दरवर्षी पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. कौटुंबिक हिंसाचारात महिलांवरच अन्याय अत्याचार होतो. महिलाच हिंसेचा बळी ठरतात हे आपल्याला माहीत आहे पण पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्र्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते, आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते अतुल सुभाष सारखे तरुण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. कायदाही महिलांच्याच बाजूने आहे. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याच्या अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याच्या अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. विकसित देशांमधील लिंग निरपेक्ष कायदे पुरुषांना महिलां प्रमाणे संरक्षण तर देतातच ; शिवाय पुरुष पीडित असू शकतात या वास्तवाचा स्वीकारही करतात. त्यामुळे तिथे या विषयावर संशोधनही होत असते आपल्या देशात पुरुषही महिला अत्याचाराने पीडित असतात हे वास्तव अजूनही स्वीकारले जात नाही. पुरुष कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरुच शकत नाही अशी धारणा असणारे लोक सामान्यतः असा तर्क देतात की पुरुष हे महिलांपेक्षा बलवान असतात अशा स्थितीत महिला पुरुषांवर आघात कशा करू शकतात? पण एका संशोधनात असे सिद्ध झाले आहे की हिंसक संबंधांमध्ये महिलाही पुरुषां इतकीच आक्रमक होऊ शकते. शिवाय मानसिक छळ करण्यात महिलांचा हात कोणीही धरू शकणार नाही. विशेषतः जे संवेदनशील मनाचे पुरुष असतात ते अशा हिंसाचाराला बळी पडतात त्यामुळे महिलां प्रमाणेच पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

# अधावत मूलभूत व्यवस्था व सोयी सुविधांसह माळेगाव यात्रा यावर्षी अधिक संस्मरणीय होईल

## जिल्हा परिषद सिईओ मीनल करनवाल यांनी दिली ग्वाही

**– पायाभूत सुविधांमध्ये यावर्षी वाढ**
**– सुरक्षा, स्वच्छता, जागरुकतेकडे लक्ष**
**– लावणी महोत्सव यावर्षीही आकर्षण**
**– पाच दिवसांच्या नियोजनाची माहिती जाहीर**

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील महत्वपूर्ण तसेच दक्षिण भारतात प्रसिध्द असलेली असलेल्या माळेगाव यात्रेला यंदाही संस्मरणीय ठरविण्यासाठी जिल्हा प्रशासन कामाला लागले आहे. यंदा अधिक प्राथमिक व मुलभूत सुविधा उपलब्ध केल्या जातील. या यात्रेचे औचित्य, महत्व आणि परंपरेला जोपासण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मीनल करनवाल यांनी दिली.

आज जिल्हा परिषदेच्या यशंतवराव चव्हाण सभागृहात माळेगाव यात्रा पूर्वतयारी संदर्भात पत्रकार परिषद घेण्यात आली, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा जाधव-कापसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पाटील, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, जलसंधार विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक भोजराज, सहाय्यक जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी सुनील गिरी, नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, प्रभारी कृषी विकास अधिकारी सचिन कपाळे, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम संजय शिंदे, विशाल चोपडे, आदींची यावेळी उपस्थिती होती

दिनांक २९ डिसेंबर २०२४ ते २ जानेवारी २०२५ या पाच दिवसाच्या कालावधीमध्ये माळेगाव यात्रा असेल. २९ डिसेंबर रोजी देवसवारी आणि पालखी पुजनाने यात्रेची सुरुवात होणार आहे. पाच दिवसांमध्ये शेतकऱ्यांसाठी भव्य कृषी व पशु प्रदर्शन असेल. कृषिनिष्ठ शेतक-यांचा सत्कार, अश्व, श्वान, कुकूट प्रदर्शन व विविध स्पर्धेचे उद्घाटन, कुस्त्यांची दंगल, पारंपारीक लोककला महोत्सव, महिला आरोग्य शिबिर तसेच शेवटच्या दिवशी लावणी महोत्सव प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

कुस्ती दंगल व लोककला महोत्सव: पारंपरिक कलेला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यंदाची यात्रा प्लास्टिकमुक्त यात्रा करण्यावर भर असेल. कचरा व्यवस्थापनासाठी ट्रॅक्टर, हॉटेल व खानावळांसाठी डस्टबिन्स ठेवण्यात येतील. मंदिर परिसरात प्लास्टिक



मुक्तीसाठी जनजागृती आणि महिला बचत गटांकडून कापडी पिशव्यांचे स्टॉल्स उभारले जातील. म्बुलन्स आणि रुग्णवाहनासाठी बाईक सेवा सुरू करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जात असून पोलीस प्रशासनाच्या मदतीने चोख बंदोबस्त ठेवला जाणार आहे. मागील वर्षी तलावाच्या ५० टक्के पायऱ्यांचे काम पूर्ण झाले होते, यंदा उर्वरित पायऱ्यांसह पालखीसाठी ओटा तयार केला जाईल. रस्ते मोकळे ठेवून छोटे व्यापारी एकत्रितपणे ठराविक जागेवर दुकाने लावू शकतील, असे जिल्हा परिषदेने नियोजन केले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगीतले आहे.

जिल्हा परिषदेने महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन, अग्निशमन, राज्य उत्पादन शुल्क, बीसएसएनएल, राज्य परिवहन महामंडळ, देवस्थान समिती आणि अन्य विभागांच्या समन्वयाने यात्रा यशस्वी करण्यासाठी तयारी सुरू केली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगीतले. यात्रेतील प्रत्येक भाविकाला सुरक्षित आणि सुविधा-संपन्न वातावरण देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्या म्हणाल्या. जिल्हा परिषदे कडून होणाऱ्या या उपायोजनेत व सुविधांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केली आहे. प्रत्येक नागरिकांनी या ठिकाणी स्वच्छता राहण्यासाठी जागरूक असावे तसेच सहकार्य करावे, विद्यार्थी स्वयंसेवक व यात्रेकरूंनी देखील यात्रेमध्ये शासनाने निर्माण केलेल्या सोयी सुविधांचा उपयोग घ्यावा तसेच स्वच्छता व शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करावी असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## कृत्रिम बुध्दिमत्ता आणि पत्रकारिता या विषयावर प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांचे आज व्याख्यान

प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा संयुक्त उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** कृत्रिम बुध्दिमत्ता आणि पत्रकारिता या विषयावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांचे उद्या बुधवार दिनांक १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता प्रेस क्लब येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

प्रेस क्लब ऑफ नागपूर व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारितेमध्ये होत असलेल्या कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर या विषयावर आयोजित व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार व माजी राज्य माहिती आयुक्त श्री. राहुल पांडे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रेस क्लब ऑफ नागपुरचे अध्यक्ष श्री. प्रदीप मैत्र तसेच नागपूर व अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे यांनी केले आहे.

## तयारीला लागा यंदा एमपीएससी मार्फत वर्षेभर परीक्षाच-परीक्षा

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्य शासनामार्फत यावर्षी मोठ्या प्रमाणात परीक्षा घेतल्या जाणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने यावर्षी होणाऱ्या प्रमुख परीक्षांचे वेळापत्रक जाहिर केले आहे. त्यामुळे शासन सेवेत येण्यास इच्छूक असणाल्या गुणवान, मेहनती व महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांनी तयारीला लागावे. स्पर्धा परीक्षेचे वेळापत्रक नव्या वर्षात तुमची वाट बघत आहे.

नव्या वर्षात ५ जानेवारी रोजी महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पुर्वपरीक्षा होणार आहे. यामध्ये सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, दुय्यम निबंधक श्रेणी-१, मुद्रांक निरीक्षक या पदांचा समावेश आहे. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पुर्वपरीक्षा २ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक, बेलिफ व लिपीक टंकलेखक, सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदांचा यामध्ये समावेश आहे. १६ मार्च रोजी दिवाणी न्यायाधीश व कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी या पदासाठीची पुर्वपरीक्षा आहे. महाराष्ट्र नागरी सेवा पुर्व परीक्षा नुकतीच झाली असून २६ एप्रिल रोजी ३५ संवर्गातील मुख्य परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा १० मे, २०२५, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा १८ मे, २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा १८ मे, २०२५ समावेश आहे.

तसेच दिनांक स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येणार असलेल्या परीक्षामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पुर्व परीक्षा २८ सप्टेंबर, २०२५, राज्यसेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, विद्युत अभियांत्रिकी मुख्य परीक्षा, स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा आदिंचा समावेश आहे. याशिवाय यावर्षेभरात झालेल्या पुर्व परीक्षांच्या सर्व मुख्य परीक्षा या वर्षेभरात होणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी कळविले आहे. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी तयारी करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. याबाबतची अधिकची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## स्वप्नील जोशीने दिली आनंदाची बातमी! पहिल्या गुजराती चित्रपटाची घोषणा, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या अभिनेत्रीसह करणार काम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी चित्रपटसृष्टीचा 'मितवा' म्हणून स्वप्नील जोशीला घराघरांत ओळखलं जातं. 'दुनियादारी', 'तू ही रे', 'मितवा', 'प्यारवाली लव्हस्टोरी', 'वाळवी' यांसारख्या गाजलेल्या सिनेमांमध्ये स्वप्नीलने काम केलं आहे. मराठी मालिका, चित्रपट, वेबसीरिज अशा तिन्ही माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणार हरहुन्नरी अभिनेता म्हणून त्याला ओळखलं जातं. प्रेक्षकांच्या याच लाडक्या अभिनेत्याने वर्षाखेरीस सर्वांना एक आनंदाची बातमी दिली आहे. मराठी चित्रपटसृष्टी गाजवणार स्वप्नील आता लवकरच एका गुजराती चित्रपटात झळकणार आहे.

स्वप्नील जोशी २०२५ मध्ये गुजराती चित्रपट इंडस्ट्रीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या पहिल्या गुजराती चित्रपटाचं नाव आहे 'शुभचिंतक'. या चित्रपटात स्वप्नीलबरोबर राष्ट्रीय पुरस्कार विजेती अभिनेत्री मानसी पारेख मुख्य भूमिकेत झळकणार असल्याची माहिती समोर आली आहे.

'शुभचिंतक' या चित्रपटाची निर्मिती पार्थिव गोहिल आणि मानसी पारेख त्यांच्या सोल सूत्र या बॅनरखाली करत आहेत. यापूर्वी 'गोलकेरी', 'कच्छ एक्स्प्रेस' आणि 'झामकुडी' या गाजलेल्या चित्रपटाची निर्मिती त्यांनी केलेली आहे. या तीन चित्रपटांच्या यशानंतर आता 'शुभचिंतक' त्यांच्या बॅनरचा चौथा चित्रपट असणार आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी निसर्ग वैद्य यांच्याकडे आहे. हा चित्रपट एक डार्क कॉमेडी थ्रिलर असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.

पहिल्या गुजराती चित्रपटाबद्दल उत्सुकता व्यक्त करताना स्वप्नील म्हणाला, गुजराती इंडस्ट्री गेल्या वर्षात वेगाने विकसित होत आहे आणि वैविध्यपूर्ण विषयांची निर्मिती त्याठिकाणी केली जात आहे. एक कलाकार म्हणून ही संधी माझ्यासाठी नक्कीच खास आहे आणि गुजराती चित्रपट विश्र्वात काहीतरी वेगळं करायला मिळतंय याचा मला आनंद आहे. मी नेहमीच मानसीची एक अभिनेत्री म्हणून प्रशंसा केली आहे आणि तिच्याबरोबर काम करण्याची माझी इच्छा पूर्ण होत आहे. या भूमिकेने मला नक्कीच एक नवीन आव्हान दिलं आहे आणि ही भूमिका साकारण्यासाठी मी प्रचंड उत्सुक आहे.

चित्रपटाची मुख्य अभिनेत्री-निर्माती मानसी पारेख पुढे म्हणाली, स्वप्नील या चित्रपटात ऑनबोर्ड झाला आहे याचा आम्हाला सगळ्यांना आनंद झाला आहे. स्वप्नीलबरोबर स्क्रीनस्पेस शेअर करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. आम्ही लूक टेस्ट आणि वर्कशॉपसाठी आधीच भेटलो आहोत आमच्या सुरुवातीच्या नोट्सची देवाणघेवाण केली आणि आता शूटिंगला कधी एकदा सुरुवात होतेय यासाठी सगळेच आतुर आहेत.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नामांकित कंपनीच्या नावाखाली फसवणूक, मात्र एटीएममधून पैसे काढले आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकले; दोन अटक, एक फरार

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** बजाज फायनान्स या नामांकित कंपनीच्या नावाने नागरीकांची आ'नलाईन फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. लोनचे आमिष दाखवून ते फसवणूक करीत होते. या गुन्ह्यातील म्होरक्या समीर राणे याच्या शोधात मानपाडा पोलिस आहेत. धक्कादायक म्हणजे बंगालचा फोन नंबर आणि बँक अकाऊंटनंबर वापरून ही फसवणूक केली जात होती. मात्र कल्याण पूर्वेतील चक्कीनाका परिसरातून हा गोरखधंदा सुरु होता.

ते काही दिवसांपूर्वी डोंबिवली पूर्वे तील आजदे गावात राहणारे किरण कोळे यांनी मानपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यांची ऑनलाईन




फसवणूक करुन जवळपास एक लाख रुपये उकळले आहेत. किरण यांना पैशांची गरज होती. त्यांना एका दिवशी त्यांच्या मोबाईलवर फोन आला. फोनवरुन बोलणाऱ्या व्यक्तीने आम्ही बजाज फायनान्स कंपनीतून बोलतो आहे. तुम्हाला लोन पाहिजे असेल तर सांगा. लोनसाठी लागणारे विविध प्रकारचे चार्जेस असल्याचे सांगून त्यांच्याकडून त्यांनी एक लाख रुपये उकळले. किरण यांच्या लक्षात आले की, त्यांना लोन दिले गेले नाही. केवळ पैशाची मागणी केली जात आहे. त्यानंतर त्यांनी पोलिस ठाण्यात या प्रकरणी तक्रार दिली. मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक राम चोपडे यांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला. सुरुवातीला तपासात असे समोर आले की, जो मोबाईल नंबर आणि ब'क आकाऊंटनंबर हा बंगालचा आहे. तपासादरम्यान एक गोष्टी लक्षात आली की, जे पैसे काढले गेले आहे. ते ठिकाण अंबरनाथ आणि मलंग रोड आहे. ज्या ठिकाणच्या एटीएममधून फसवणूक करणाऱ्यांनी पैसे काढले आहेत. पोलिसांनी संबंधीत बँकेकडून सीसीटीव्ही फूटेज मागवून घेतले. सीसीटीव्हीच्या फूटेजमध्ये पोलिसांना पैसे काढणारे दोन व्यक्ती दिसून आले. या दोन्ही व्यक्तींनी एटीएममधून पैसे काढले होते. त्यापैकी एक व्यक्ती हा कल्याण पूर्वेतील चक्कीनाका परिसरात राहतो. पोलिसांनी या व्यक्तीच्या दुचाकी गाडीचा नंबरही शोधून काढला. त्याचा माग काढत पोलिस चक्कीनाका येथे पोहचले. संबंधित व्यक्ती दुचाकी घेऊन चक्कीनाका येथे आला. मात्र त्वरीत दुसऱ्या ठिकाणाकरीता दुचाकी घेऊन निघाला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला असता हा व्यक्ती दुचाकीवरुन पलावा येथे पोहचला. त्याठिकाणी पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. अमोल राऊत असे त्याचे नाव होते. त्यानंतर अमोलने दिलेल्या माहितीवरुन टिना चव्हाण नावाच्या महिलेस ही मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. अमोल फक्त आपला अकाऊंट नंबर समीर राणे आणि टिना चव्हाण यांना वापरण्यासाठी दिला होता. ज्या लोकांची फसवणूक केली जात होती. त्यांच्याकडून येणाऱ्या एकूण रक्कमपैकी ३० टक्के रक्कम अमोल घेत होता. उर्वरीत ७० टक्के रक्कम समीर घेत होता. अमोल, टिना आणि समीर हे तिघांपैकी समीर आणि टिना हे अनेक वर्षापासून बँकेचे काम पाहत आहेत. त्यांना लोन कसे दिले जाते याची माहिती असल्याने त्यांनी त्याचा फायदा घेत लोकांची फसवणूक करीत होते. अंबरनाथमध्येही या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल आहे. यांनी आत्तापर्यंत अनेक लोकांची अशा प्रकारे फसवणूक केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिस समीरच्या शोधात आहेत.

## महत्त्वाचे...

### कौटुंबिक वादातून सुंदर नगर येथे एकाचा मृत्यू





दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरातील सुंदर नगर येथे भाड्याने राहत असलेल्या एका तरुणाचा कौटुंबिक वादातून जबर मारहाण केल्याने मृत्यू झाला. फारूक निजाम शेख असे या मयत तरुणाचे नाव आहे. मयत तरुण हा बदनापुर तालुक्यातील देवगाव येथील राहिवासी असून सध्या सुंदरनगर येथे भाड्यावे खोली घेऊन राहत होता. सदरील घटना रात्रीच्या सुमारास घडली असून मयताच्या गळ्यावर दोरीच्या फासाचे निशाण असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. आज सकाळी फारूक निजाम शेख याचा मृतदेह शव विच्छेदनासाठी शहरातील शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये पाठवण्यात आला होता. शवविच्छेदनानंतर नातेवाईकांनी मृतदेह थेट चंदनझीरा पोलीस ठाण्यात आणून ठेवला. जोपर्यंत मारेकऱ्यांना अटक होऊन खुनाचा गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह हलवणार नसल्याची भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे.

### नांदेडच्या बारड येथे तरुण शेतकऱ्याचा स्ट्रॉबेरी शेतीचा यशस्वी प्रयोग





दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाबळेश्वर सारख्या थंड वातावरणात येणारी स्ट्रॉबेरी मराठवाड्या सारख्या परिसरात पहावयास मिळत नाही. मात्र नांदेड जिल्ह्यातील बारड येथील बालाजी उपवार या तरुण शेतकऱ्याने स्ट्रॉबेरी शेतीचा यशस्वी प्रयोग करून दाखवला आहे. योग्य शास्त्रीय पद्धतीने लागवड करून आता हा शेतकरी स्ट्रॉबेरी शेतीतून आर्थिक उन्नती साधत आहे.



बालाजी उपवार या तरुण शेतकऱ्याचे बी.एससी.ॲग्री पर्यंत शिक्षण झाले आहे. मागील पाच वर्षापासून उपवार हे आपल्या शेतीत स्ट्रॉबेरीची लागवड करत आहेत. या शेतकऱ्याने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपल्या शेतात स्ट्रॉबेरीचा यशस्वी प्रयोग करून दाखवला. यंदा उपवार यांनी आपल्या १५ गुंठे शेतीत स्ट्रॉबेरीची लागवड केली आहे. त्यांच्या स्ट्रॉबेरीला मोठी मागणी आहे.

### संतोष देशमुख हत्या प्रकरण; आमदार रोहित पवारांची देशमुख कुटुंबाला भेट

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबांची भेट घेऊन सांत्वन केले. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावातील संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला. याचे पडसाद संपूर्ण राज्यासह अधिवेशनात देखील पाहायला मिळाले. अशातच आज आमदार रोहित पवार यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेतली आहे.



# आज अल्पसंख्यांक हक्क दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात व्याख्यान

■ नागरिकांनी व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** जगभरातील राष्ट्रीय वार्षिक धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी सर्व समाजाने पुढे यावे असे आवाहन संयुक्त राष्ट्र संघटनेने केले आहे. १८ डिसेंबर हा जगभर अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो. निमित्त आयोजित व्याख्यानाला जिल्हाधिकारी कार्यालयात उद्या१८ डिसेंबरला अकरा वाजता उपस्थित राहण्याच्या आवाहन प्रशासनाने केले आहे.

जगभरात विविध ठिकाणी विविध जाती, धर्म ,पंथ ,भाषिक समुदाय, अल्पसंख्यांक ठरतात. बहुसंख्यांकांमध्ये अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व व त्यांच्या न्याय हक्काचे रक्षण व्हावे यासाठी अशा समुदायांना अल्पसंख्याकांचा दर्जा दिला जातो. १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय वार्षिक धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्वीकृत करून प्रस्तुत केला आहे.




या दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काबाबत जाणीव किंवा माहिती करून दिली जाणार आहे. त्यानुसार १८ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे सकाळी ११ वाजता या संदर्भातील एक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. मंत्रालयातील सेवानिवृत्त सहसचिव ॲडवोकेट देवेंद्रसिंग निर्मले, तसेच सामाजिक विज्ञान नारायणा ई टेक्नो स्कूल नांदेड येथील विभाग प्रमुख श्री. इर्शाद अहमद या दोन वक्त्यांचे व्याख्यान उद्या होणार आहेत. तरी अल्पसंख्यांक समुदायातील तसेच मागासवर्गीयातील समुदायांनी या व्याख्यानाला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

उद्या बरोबर अकरा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला समाजातील सर्व अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती, जमाती व विविध वर्गातील सर्व मान्यवर आमंत्रित आहेत.

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www.mahagosevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. विधानभवनातील समिती सभागृहात या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात १ कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मूल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारीत शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे



काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील, असेही श्री. मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भुत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

संकेतस्थळाच्या अनावरण प्रसंगी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.

## *स्वाधार योजनेची मुदतवाढ ३१ डिसेंबरपर्यंत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा*

***नांदेड/प्रतिनिधी :*** *वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही म्हणून नाराज न होता खाजगी स्तरावर भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणारी अनुसूचित जातींसाठीची लोकप्रिय योजना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्री. शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.*

*महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेश मिळू शकला नाही. त्या विद्यार्थ्यांना खाजगी स्तरावर राहण्यासाठी भोजन निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणारी ही योजना आहे.त्यामुळे या योजनेचा लाभ अनुसूचित जातीच्या मुलांनी घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.*

*वसतीगृह स्तरावरून रिजेक्ट करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना व ज्या विद्यार्थ्यांनी वसती गृह स्तरावरून रिजेक्टचा अर्ज स्वाधार सर्विस ला कन्वर्ट किंवा वर्ग करावा म्हणून सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नांदेड यांना विनंती अर्ज केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी यासंदर्भात एडिट ऑप्शन आल्यानंतर स्वाधार सर्विस हे ऑप्शन निवडून स्वाधारला अर्ज भरावा. अर्जाची प्रिंट काढून स्वाधार सव्हीस हे ऑप्शन निवडून स्वाधारला अर्ज भरावा.*

*शासन निर्णयातील निकषानुसार सर्व कागदपत्रे जोडून अर्जाची प्रिंट काढून स्वाधार शासन निर्णयातील निकषानुसार सर्व कागदपत्रे जोडून संबंधित महाविद्यालयातील समान संधी केंद्रात विहित कालावधीत अर्ज सादर करावेत. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांनी ३१ डिसेंबर पर्यंत अर्ज भरून घ्यावे, असे आवाहन श्री. शिवानंद मीनगिरे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी केले आहे.*

# मध्य रेल्वेच्या एसी ट्रेनमध्ये महिलांच्या डब्यात नग्न व्यक्तीचा प्रवेश; महिलांमध्ये गोंधळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या एसी लोकल ट्रेनमध्ये महिलांच्या डब्यात एका नग्न व्यक्तीने अचानक प्रवेश केल्याने मोठा गोंधळ उडाला होता. या प्रकाराचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हा प्रकार काल सायंकाळी ४ वाजून ११ मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण दिशेने जाणाऱ्या एसी लोकल ट्रेनमध्ये घडला आहे. घाटकोपर स्टेशनदरम्यान ही ट्रेन आल्यानंतर एका नग्न अवस्थेतील व्यक्ती महिलांच्या डब्यात चढला, त्यानंतर महिलांनी



मोठा गोंधळ घातला. महिलांचा गोंधळ पाहून तिकीट निरीक्षकाने त्या व्यक्तीला धक्का देऊन ट्रेनच्या बाहेर काढले. मात्र या घटनेमुळे महिला प्रवासी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. महिलांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत,गर्दी नसतानाही घटना कशी घडली? एसी ट्रेनचे दरवाजे बंद होतात. त्यामुळे असा प्रकार कसा घडला, याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. त्याच बरोबर जे मुख्य स्टेशन आहे त्या स्टेशनवर मोठ्या प्रमाणात महिला प्रवास करत असून महिलांच्या डब्याच्या सुरक्षेसाठी रेल्वे प्रशासनाकडून आरपीएफ आणि जीआरपी कर्मचारी तैनात असतात. मात्र, मुख्य स्टेशनवर कर्मचारी कमी असल्याचे वारंवार दिसून येत आहे. सुरक्षारक्षकांची संख्या वाढवण्यासाठी तातडीने भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी केली आहे.

# क्रिकेटर अजिंक्य रहाणे यांची सोलापुरातील अंगणवाडीला भेट

## चिमुकल्यांसोबत मारल्या गप्पा आणि चाखली खिचडी

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** भारताचा स्टार फलंदाज म्हणून ओळख असलेल्या अजिंक्य रहाणे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर या गावातील अंगणवाडी तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांना भेटी दिली. यावेळी त्यांनी अंगणवाडीत तयार होणारी खिचडीची चव चाखत चिमुकल्यासोबत मनमोकळ्या गप्पा मारल्या.

अर्थ फिट या सामाजिक संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रम पाहण्यासाठी अजिंक्य रहाणे





हे सोलापूर दौऱ्यावर आहेत. यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर या ठिकाणी त्यांनी गाव फिरताना जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडी तसेच इतर ग्रामपंचायत या ठिकाणी भेटी देत त्या ठिकाणी पाहणी केली.

अंगणवाडीतील चिमुकले विद्यार्थी तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत त्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात येत असलेल्या खिचडी किचनला त्यांनी भेट दिली यावेळी विद्यार्थ्यांची खिचडी त्यांनी टेस्ट केली. नंतर मुलांमध्ये बसून गप्पाही मारल्या.

# शारंगधर बालाजी महोत्सवाची महाप्रसादाने शानदार सांगता

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर नगरीचे आराध्य दैवत भगवान शारंगधर बालाजी यांचा १३६ वा प्रगट दिन महोत्सव शुक्रवार ६ ते १७ डिसेंबर मंगळवार पर्यंत मोठ्या उत्साहाने व धार्मिक वातावरणात संपन्न झाला. या कालावधीमध्ये शारंगधर बालाजी मूर्तीला वेगवेगळ्या देवता व देवी यांच्या नयन मनोहर पोशाखात सजविण्यात आले होते.भगवंताचे या पोशाखामधील शारंगधरचे दर्शन घेण्याकरता जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यभरातून भाविक भक्त शारंगधर नगरी मेहकर येथे आले होते.आज माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते महाप्रसाद वितरणाचा शुभारंभ करून वितरण करण्यात आले.

सकाळी शारंगधर बालाजी भगवान यांच्या नयन मनोहर मूर्तीला विधिवत मंत्रोपचारामध्ये पूजा पाठ करून वैदिक मंत्रांद्वारे अभिषेक होऊन आरती करण्यात आली. पूर्ण मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात आली. यावेळी जय जय गोविंद जय हरी गोविंद याचा जयघोष करण्यात आला.

११ क्वि. मोतीचूर लाडू तसेच २१ क्विंटल वांग्याची भाजी व २१ क्विंटल गव्हाच्या पोळ्या असा महाप्रसाद बनविण्यात आला होता. मागील दोन दिवसापासून महाप्रसाद बनवण्याचे कार्य मंदिर परिसरामध्ये सुरू होते. आज दुपारी माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते महाप्रसाद वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. भाविकांसाठी पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था महाराष्ट्र अर्बनचे संचालक अजय उमाळकर ,स्वप्निल घोडे, व मानधना यांच्यावतीने करण्यात आली.

बालाजी उत्सव अन्नदान सेवा समिती च्या सर्व सदस्यांनी आपले अमूल्य योगदान दिले. यावेळी उत्सव समितीचे राजीव जैस्वाल , उदय सोनी, सखाराम लाहोटी, मनोज सावजी, सुरेश तिवारी, आशिष उमाळकर, प्रशांत सावजी, वासुदेव वराडे, सुनील मुंदडा, गिरीश रूपडा, पुरुषोत्तम शर्मा, सुरेश मुंदडा यांनी महाप्रसादाचे नियोजनबद्ध वितरणासाठी परिश्रम घेतले. शारंगधर बालाजी संस्थांनचे अध्यक्ष ड. संजय सदावर्ते सचिव दीपक पांडे, विश्र्वस्त डॉ. विनय सावजी , उमेश मुंदडा, डॉ. नंदकुमार उमाळकर, ऍड .हेमंत देशमुख, गोपाल अग्रवाल, अभय सावजी, विजय भिते, व्यवस्थापक हनुमंत देशमुख याप्रसंगी प्रसंगी उपस्थित होते. गजानन देशमुख, पंकज बोरकर, विनायक बदामे, गोपाल जाधव यांनी अथक परिश्रम घेतले.

भाविक भक्त महाप्रसाद सेवन करीत असतांना 'श्री शारंगधर भजनी मंडळाद्वारे' नादब्रम्हाच्या सात्विक आनंदाची बरसात चालू होती. अनिल इंगळे, पुरुषोत्तम शीलवंत या कलाकारांसह ज्ञानदेव हरणे, अशोक अडेलकर, प्रा. रमेश आखरे, प्रा. किशोर क्षीरसागर श्रीराम झनक, किशोर मैंद, संदीप सावळकर, गजानन अवचार या भजन मंडळ सदस्यांनी संगीताच्या सरींची बरसात करून सर्वांना मुग्ध केले.

विविध वृत्त...

## तरुणीच्या हत्येचा उलगडा करण्यात यवतमाळ एलसीबी पथकाला आले यश; पत्रकार परिषदेत पोलीस अधीक्षक यांनी दिली माहिती



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** दगडाने ठेचून एका तरुणीची हत्या करण्यात आल्याची घटना दोन दिवसापूर्वी यवतमाळच्या मादणी घाटातील एका जंगलामध्ये उघडकीस आली होती. धनश्री पेठकर असे हत्या झालेल्या तरुणीचे नाव आहे. या घटनेचा उलगडा करण्यात स्थानिक गुनिशा का पथकाला यश आले आहे प्रमोद कोदाने असे गजाआड करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. प्रमोद या आरोपीच्या दुचाकीची धनश्री हिच्या दुचाकीला धडक लागली होती. दरम्यान धनश्रीने आरडाओरोड केल्यानंतर नागरिकांनी त्याला चोप दिला होता. याचाच वचपा काढत प्रमोदने धनश्रीची दगडाने ठेचून हत्या केल्याची कबुली त्याने पोलिसांकडे दिली अशी माहिती पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिली आहे.

## तीन चाकी ऑटो व मोटरसायकल अपघात एक जण गंभीर जखमी



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर ते नागपूर रोड वरिल डोणगाव पोलीस स्टेशन हद्दीतील डोणगाव जवळच एका एअर हाऊस वळण रस्त्यावर हा अपघात घडला आहे या अपघातामध्ये एक जण गंभीर जखमी असून एक किरकोळ जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जखमीला तात्काळ मेहकर येथे रेफर करण्यात आले आहे तर किरकोळ जखमी याला प्राथमिक उपचारासाठी डोणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. सदर ऑटो हा बोरी येथील असल्याची माहिती आहे तर मोटरसायकल चालक हा डोणगाव येथील असल्याची प्राथमिक चर्चा होती. घटनास्थळावर डोणगाव पोलीस स्टेशन पोलीस कर्मचारी तात्काळ पोहोचल्याचे दिसून आले व पुढील तपास डोणगाव पोलीस करत आहेत..



# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २०२५ मधील परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहिर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिद्ध करण्यात आले आहे. दरवर्षी आयोगाकडून पुढील वर्षीच्या परीक्षांचं संभाव्य वेळापत्रक जाहीर केलं जाते. यामुळे विविध शैक्षणिक संस्था व विद्यार्थ्यांना परीक्षांची तयारी आणि नियोजन करण्यासाठी मदत होते.

शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते, त्यानुसार सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे दिनांक निश्रि्चत करण्यात आले आहेत. प्रस्तावित परीक्षेचे वेळापत्रक निश्रि्चत करताना संघ लोकसेवा आयोग, विविध विद्यापिठे, परीक्षा घेणाऱ्या इतर संस्था इत्यादिंकडून आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक विचारात घेऊन आयोगाच्या परीक्षांचे वेळापत्रक निश्रि्चत करण्यात येते. जेणेकरुन, आयोगाच्या संबंधित संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी येणार नाही व उमेदवारांचे नुकसान होणार नाही. यासंदर्भात विधीमंडळातही अनेकवेळा चर्चा झाली असून त्यावेळी विधीमंडळात देण्यात आलेल्या आश्र्वासनानुसार कोणत्याही परीक्षा एकाच दिवशी येणार नाहीत, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यानुसार सर्व संबंधित संस्थांना प्रस्तावित वेळापत्रकाची प्रत पाठवून यासंदर्भात दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी खेड्यापाड्यातील गरीब व होतकरु उमेदवारांनी संभाव्य परीक्षांचे नियोजन करुन लाभ घ्यावा.

## तूर पिकावर अळीचा प्रादुर्भाव; शेतकऱ्यांनी जैविक व रासायनिक खतांची फवारणी करावी, जिल्हा कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** तुरीचे पीक फुलधारणा अवस्थेत असताना वातावरणामुळे किडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. फवारणी करूनही किडीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविता येत नसल्याने, उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. यंदाच्या खरीप हंगामात शेतकरी सततच्या पावसामुळे अडचणीत आले आहेत. त्यातच तूर पिकावर मोठ्या प्रमाणात किडींचा प्रादुर्भाव झाल्याने उरल्यासुरल्या पिकाचेही नुकसान होऊन उत्पादन घटण्याची शक्यता वाढली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी घाबरून न जाता किडींचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी जैविक आणि रासायनिक खतांची फवारणी करावी असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज कुमार ढगे यांनी केले आहे.

## परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी ढाणकी शहर कडकडीत बंद




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** परभणी येथे झालेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ संविधान प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणी परभणी येथील भीम सैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडी मृत्यू प्रकरणी आंबेडकर अनुयायी,संविधान प्रेमी व समाजाच्या वतीने मंगळवार १७डिसेंबर रोजी ढाणकी बंद हाक मध्ये ढाणकी शहराने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन ढाणकी शहर कडकडीत बंद केला. या बंद मध्ये शहरातील सर्व व्यापारी वर्गाने सहकार्य करून बंद शंभर टक्के यशस्वी केला. व्यापारी वर्गांनी प्रतिसाद दिल्यामुळे बंद शांततेत पाळण्यात आला. यावेळी बिटरगाव पोलीस स्टेशन ठाणेदार यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की परभणी येथील घटनेत संबंधित जवाबदार असलेल्या पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी यांच्यावर खुणाचा गुन्हा दाखल करून या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोशींवर कारवाई करावी आंबेडकरी तरुणांवरील जाळपोळ आणि दंगलीचे गुन्हे तात्काळ मागे घ्यावे, मृतकाच्या कुटुंबास ५० लाखाची मदत द्यावी, मृतकाच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी समाविष्ट करावे. शहरांमध्ये आंबेडकर चौकातून रॅली काढून छत्र पती शिवाजी चौक येथे एकत्र येतं त्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला .

शहरातील तणावग्रस्त परिस्थिती लक्षात घेता बिटरगाव पोलीस स्टेशन ठाणेदार संतोष मनवर व पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## प्रवाश्यांच्या समस्या व निराकरणासाठी दर सोमवार व शुक्रवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन

### राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ वर्धा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दि.१५ जुलै पासुन दर सोमवार व शुक्रवारला सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन व दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन आयोजित करण्यात येणार आहे. प्रवाशी आणि महामंडळाचे कामगार यांनी याचा लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा–महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्र्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.

बुलडाणा विभागातील आगारामध्ये प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. खामगाव आगार येथे शुक्रवार दि. २० डिसेंबर, मेहकर येथे सोमवार, दि. २३ डिसेंबर, मलकापूर येथे शुक्रवार, दि. २७ डिसेंबर, जळगांव जामोद येथे सोमवार, दि. ३० डिसेंबर, शेगांव येथे शुक्रवार, दि. ३ जानेवारी रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

